पनवेल (प्रतिनिधी) संपत्तीपेक्षा माणुसकी महत्वाची असते आणि ती माणुसकी लोकनेते रामशेठ ठाकूर व आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडे आहे, असे प्रतिपादन रायगड जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष तथा ज्येष्ठ नेते जी.आर.पाटील यांनी तळोजा येथे शनिवारी केले.आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून श्री.रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ व तळोजा विभागीय कॉंग्रेस कमिटीच्यावतीने ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार व छत्री वाटप समारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात आठशेहून अधिक ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार झाला. यावेळी ज्येष्ठ नागरिकांना शासकीय ओळखपत्र प्रदान करण्यात आले. त्याप्रसंगी पाटील बोलत होते.

जी.आर.पाटील पुढे म्हणाले की, सामाजिक जाण आणि मानवता धर्माचे पालन करण्याचे काम लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून होत असून आपल्या व्यवसायातून मिळालेल्या नफ्याचा ५० टक्क्याहून अधिक रक्कम समाजकार्यासाठी वापरून सामाजिक बांधिलकी जपण्याचे प्रामाणिक काम त्यांनी केले आहे. गेल्या १८ वर्षापासून गोरगरीब विद्यार्थ्यांना मोफत वहया, गणवेश त्याचबरोबरीने आर्थिक मदत देण्याचे काम रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली केले जात आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांनी अवघ्या साडेचार वर्षात करोडो रूपयांची कामे करून इतिहास रचला आहे. ज्येष्ठ नागरिकांच्या आशिर्वादात फार मोठी ताकद असून विकासाचा महारथ असाच सुरू राहण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांना आपले आशिर्वाद हवे आहेत आणि त्यांना ते देवून ज्येष्ठ नागरिक पुन्हा प्रशांत ठाकूर यांना आमदार करतील यात तिळमात्र शंका नाही असे सांगून पनवेलच्या सर्वांगिण विकासासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांना मोठया मताधिक्याने निवडून द्यावे असे आवाहनही जी.आर.पाटील यांनी यावेळी केले.

यावेळी अरूणशेठ भगत यांनी आपल्या भाषणातून सांगितले की, ज्येष्ठ नागरिकांच्या आशिर्वादातून आमदार प्रशांत ठाकूर आमदार झाले. आणि त्याच आशिर्वादाच्या जोरावर पनवेल मतदार संघात डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन, उडडाणपूल, नाटयगृह, प्रशासकीय इमारत, अल्पसंख्यांक विद्यार्थीनीसाठी वस्तीगृह, समाजमंदिरे, रस्ते, भुयारी गटारे अशी विविध प्रकारची शेकडो कोटी रूपयांची विकासकामे करू शकले आहेत. दरवर्षी लोकनेते रामशेठ ठाकूर व आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना वहया, गणवेशचे वाटप तसेच गरजूंना आर्थिक मदत केली जाते. यावर्षी वहयावाटप कार्यक्रमांत आत्तापर्यंत एकूण दोन लाख मोफत वहया वाटप करण्यात आल्या असून पुढील आठवडयापासून गरजू विद्यार्थ्यांना गणवेशचे वाटप करण्यात येणार असल्याची माहितीही अरूणशेठ भगत यांनी यावेळी बोलताना दिली.

या कार्यक्रमास ह.भ.प.रामदासबुवा पाटील, पनवेल विधानसभा युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष दशरथ म्हात्रे, तळोजा जिल्हा परिषद कॉंग्रेस कमिटीचे विभागीय अध्यक्ष प्रभाकर जोशी, महिला कमिटीच्या तालुका उपाध्यक्षा रत्नप्रभा घरत, ग्राहक हित कक्षाच्या तालुकाध्यक्षा दर्शना भोईर, ज्येष्ठ कार्यकर्ते नामदेवशेठ केणी, तळोजा ग्रामपंचायतीच्या उपसरपंच वर्षा घरत, माजी सरपंच अब्दुल रेहमान पटेल, युवा नेते प्रल्हाद केणी, संतोषबुवा पाटील, ज्येष्ठ कार्यकर्ते रशिद पटेल, गोपीशेठ पाटील, चाहूशेठ पाटील, कादिरशेठ पटेल, चंद्रकांत कदम, नंदकुमार म्हात्रे, शफी पटेल, पाडुरंग पाटील, रामभाऊ वास्कर, एम.डी.पाटील, जयदास तेलवणे, मुनाफ पटेल, विश्वनाथ पाटील, यशवंत महादे, तुषार कदम यांच्यासह कार्यकर्ते आणि नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.